महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६ | दिनांक : २५/१२/२०२५ | वार : गुरूवार

## आपली पोरं सांभाळू शकली नाहीत ते मुंबई काय सांभाळणार? : एकनाथ शिंदे



**मुंबई :** महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती झाली असून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत याची अधिकृत घोषणा केली आहे. ठाकरे बंधूंच्या युतीवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टीका केली आहे. आता झालेली युती ही सत्तेसाठी असल्याची टीका त्यांनी केली आहे. तसेच ज्यांना आपली पोरं सांभाळता आली नाही ते राज्य काय सांभाळणार? असा तिखट सवालही शिंदेंनी उपस्थित केला.

एकनाथ शिंदे म्हणाले, काही युत्या या जनतेच्या विकासासाठी होतात, महायुती ही जनतेच्या विकासासाठी, मुंबईच्या विकासासाठी आहे. पण आता झालेली युती ही सत्तेसाठी आहे. निवडणुका आल्यावरच यांना मराठी माणूस आठवतो, असा टोला शिंदेंनी लगावला आहे. तसेच युती कोणाची कोणाशीही झाली तरी आमची महायुती ही महाराष्ट्रामध्ये मजबुतीने उभी आहे. लोकसभा विधानसभा, नगरपालिकांमध्ये महायुती जिंकली. त्यामुळे अशा सत्तेसाठी झालेल्या युत्यांमुळे काही फरक पडत नाही, असेही शिंदे म्हणाले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबई महापालिकेकडे यांनी सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून पाहिली. आता ही कोंबडीच कापून खायचे काम सुरू आहे. ठाकरे बंधूंची झालेली युती ही स्वार्थासाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी आहे. परंतु, जनता त्यांना त्यांची जागा दाखवणार. ठाकरे बंधूंची युती झाली तरीही विठ्ठल आमच्याकडे आहे, असे शिंदे म्हणाले. यांच्याकडे मुंबईच्या विकासाचा अजेंडा नाही. त्यांच्या प्रेस कॉन्फरन्समध्ये विकासावर एकही शब्द बोलले नाहीत. यांचा अजेंडा हा फक्त सत्तेसाठी आहे. बाळसाहेबांचा विचार ज्यांनी सोडला त्यांना राज्यातल्या जनतेने त्यांची जागा दाखवली आहे. असली काय आणि नकली काय हे नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये दाखवले असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले.

तसेच आम्ही विचारधारेला पुढे घेऊन जाणारे आहोत. मुंबईचा विकास हाच आमचा अजेंडा आहे. त्यांनी मुंबईसाठी काय केले हे सांगावे. मुंबईकर हा मुंबईच्या बाहेर फेकला गेला तो यांच्यामुळे. या मराठी माणसाला मुंबईत परत आणण्याचे काम आम्ही करणार आहोत. त्यांच्या पुनर्विकासाचे काम आम्ही करत आहोत. रमाबाई आंबेडकरमधील १७ हजार घरांचे काम आम्ही मार्गी लावले आहे. त्यांच्याकडे काय अजेंडा आहे? असा सवाल एकनाथ शिंदे यांनी उपस्थित केला.

एकनाथ शिंदे म्हणाले, जेव्हा निवडणुका येतात त्यावेळी हे 'मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार' असा बोर्ड लावतात. मुंबईकर सुज्ञ आहेत, त्यांना विकास पाहिजे आहे. आम्ही घेतलेले निर्णय हे मुंबईकरांच्या हितासाठीचे आहेत. पुढच्या सहा महिन्यात मुंबई खड्डेमुक्त होणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच ठाकरेंनी कोरोना काळात फक्त पैसाच खाल्ला. जे आपली पोरं सांभाळू शकत नाहीत ते मुंबई काय सांभाळणार? असा सवालही शिंदेंनी उपस्थित केला.

## आता नगराध्यक्षांनाही मिळणार मताचा अधिकार

**मुंबई :** राज्य सरकारने आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व देण्यासह मताचाही अधिकार देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बहुमताचा प्रश्न उद्भवला तर नगराध्यक्षांना आपले मत योग्य त्या पक्षाच्या पारड्यात टाकून प्रकरण निकाली काढता येणार आहे. हा बदल सत्ताधाऱ्यांना अनुकूल असल्याचा दावा केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत सामान्य प्रशासन विभाग, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, महसूल व नगरविकास विभागाशी संबंधित प्रत्येकी १ निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. तसेच त्याला मताचाही अधिकार मिळेल. नगर विकास विभागाचा हा एक महत्त्वाचा निर्णय आहे.

नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या सदस्य म्हणून निवडून येण्यास पात्र असलेली व्यक्ती अध्यक्ष म्हणून निवडून येण्यास पात्र असते. त्यामुळे एखादी व्यक्ती अध्यक्ष म्हणून आणि त्याचवेळी सदस्य म्हणून निवडून येऊ शकते आणि दोन्ही पदावरही निवडून येऊ शकते. अशा व्यक्तिला दोन्ही पदांसाठी जनादेश मिळालेला असतो. म्हणूनच सदस्यांमधून अध्यक्ष म्हणून निवडून आलेली व्यक्ती सदस्य राहते आणि त्याचबरोबर अध्यक्ष व सदस्य म्हणूनही काम करते.

थेट निवडून आलेल्या आणि सदस्यांमधून निवडून आलेल्या अध्यक्षास जनादेश असतोच. त्यामुळे या सुधारणेनुसार आता अध्यक्ष म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती आणि सदस्य म्हणून थेट निवडून आलेली व्यक्ती एकाचवेळी दोन्ही पदे धारण करू शकते, अशी सुधारणा करण्यात येणार आहे. तसेच अध्यक्षाला सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार मिळणार आहे. अशा व्यक्तिला अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून एक मत देण्याचा अधिकार असेल आणि मतांची बरोबरी झाल्यास, अध्यक्षाला निर्णायक मत देण्याचा अधिकार राहणार आहे, अशी सुधारणा या अधिनियमात केली जाणार आहे. त्याबाबतचा अध्यादेश काढण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली.

१.ग्राम, तालुका व जिल्हा प्रशासन सक्षम करण्यासाठी जिल्हा कर्मयोगी 2.0 व सरपंच संवाद कार्यक्रम राबविणार. (सामान्य प्रशासन विभाग)

१.राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत व सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित होणार.(ग्रामविकास व पंचायत राज विभाग)

२.धाराशिव शहरात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागाची एक एकर जागा.(महसूल विभाग)

३.महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 मध्ये सुधारणा करणार. नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या थेट निवडून आलेल्या अध्यक्षास सदस्यत्व मिळणार. मताचाही अधिकार. अधिनियमातील सुधारणेसाठी अध्यादेश काढणार.(नगर विकास विभाग)

## ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी नाही : अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र आलेत - मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीची अधिकृत घोषणा झाल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या युतीचा समाचार घेतला आहे. "काही प्रसारमाध्यमे हे दृश्य असे दाखवत आहेत की जणू रशिया आणि युक्रेनची युती होत आहे. एकीकडून पुतीन आणि दुसरीकडून झेलेन्स्की निघाले आहेत, असे चित्र उभे केले जात आहे. मात्र, ही युती केवळ स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी दोन पक्ष एकत्र आलेले आहेत. ठाकरे बंधू म्हणजे मुंबई किंवा मराठी नाही," अशा शब्दांत फडणवीस यांनी राज-उद्धव यांच्या युतीची खिल्ली उडवली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "ठाकरे बंधू एकत्र आले याचा मला आनंदच आहे. पण ते एकत्र आल्याने राजकीयदृष्ट्या फार काहीतरी घडेल असा जर कुणाचा समज असेल तर तो बाळबोध समज आहे. कुठल्याही एका पक्षाला निवडणुकीत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी जे काही करावे लागते, त्या दृष्टीने दोन अस्तित्वहीन पक्षांनी केलेली ही युती आहे. या पलीकडे याचा कोणताही अन्वयार्थ काढण्याचे कारण नाही. या युतीने महायुतीवर कोणताही परिणाम होणार नाही," असे फडणवीस म्हणालेत.

फडणवीस म्हणाले, ठाकरे बंधूंच्या युतीने फार काही परिणाम होईल, असे देखील मला वाटत नाही. ज्याप्रकारे मुंबईकरांचा विश्वासघात या मंडळींना सातत्याने केलाय. मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर घालवण्याचे काम आणि पाप यांनी केलेले आहे. त्यामुळे मराठी माणुसही यांच्यासोबत नाही. ज्याप्रकारे अमराठी माणसावर सातत्याने हल्ले केलेत, ते देखील त्यांच्यासोबत नाहीत. मुंबईमध्ये कोणीही ठाकरे बंधूंच्या सोबत येणार नाहीत. यांचा ट्रॅक रेकॉर्ड केवळ भ्रष्टाचाराचा, स्वहिताचा आहे. निवडणुका आल्यावर भाविनक बोलायचे, पण आता भावनिक बोलण्याला जनता भुलणारी नाही.

ठाकरे बंधूंनी अजून दोन-चार पक्ष सोबत घेतले तरी मुंबईकर महायुतीच्या पाठीशी उभे राहतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. "मुंबईकरांनी महायुतीचा विकास पाहिलेला आहे. विशेषतः मराठी माणसाला मुंबईतच हक्काची घरे देण्याचा कार्यक्रम महायुतीने हाती घेतला आहे. त्यामुळे मुंबईची जनता विकासाच्या मुद्द्यावर महायुतीलाच कौल देईल," असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे म्हणजे मुंबई नाहीत, मराठी नाहीत. आपण म्हणजे सर्व काही असल्याचा त्यांचा गर्व आणि दुराभिमानामुळे मुंबईकर त्यांच्यापासून दूर गेलेत. कारण मुंबईकरांना सेवेकरी हवे आहेत. राज्य गाजवणारे आणि स्वतःचा फायदा पाहणारे नको आहेत. ठाकरे बंधूंची युती म्हणजे प्रीतिसंगम नाही, तर भीतीसंगम आहे, असेही फडणवीस म्हणालेत.

उद्धव ठाकरे विकासावर बोलले तर 1 हजार रुपये मी देईन, अशी घोषणा मी मागच्या वेळेस केली होती. पण अजून माझे हजार रुपये वाचलेत. उद्धव ठाकरे विकासाची एकही गोष्ट बोलत नाहीत. आताची निवडणूक मुंबईच्या विकासाची आणि मुंबईकरांच्या हिताची आहे. त्यावर ते एक शब्द बोलत नाहीत, कारण ते बोलू शकत नाहीत. त्यांना 25 वर्षांचा हिशोब द्यावा लागेल. मिठी नदी, मराठी माणसाच्या घरांचा हिशोब द्यावा लागेल आणि तो हिशोब ते देऊ शकत नाही, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर केली.

देवेंद्र फडणवीस हा हिंदुत्वात पैदा झाला आणि हिंदुत्वातच मरेल. फक्त मतांसाठी भगवी शाल घालणारे, रोज मत बदलणारे आम्ही लोक नाहीत. मुंबई आणि महाराष्ट्र हा हिंदुत्ववादीच आहे. जे लोक हिंदुत्ववादापासून फारकत घेतील, लांगुलचालन करतील, त्यांची काय अवस्था होते, हे विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी बघितलेले आहे. आम्ही हिंदुत्ववादी कालही होतो, आजही आहोत आणि उद्याही राहणार. आमचे हिंदुत्व जनतेने पाहिलेले आहे आणि त्यांना ते मान्य आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आमचा हिंदुत्ववाद पुजा-पद्धतीवर आधारित नाही, भारतीय जीवन पद्धतीवर आधारित आहे. या भारतीय जीवन पद्धतीला स्वीकारणारा, भारतीस समाजाची मानके मानणाऱ्यांना, जसे की, प्रभु श्रीराम हे देव नाहीत, तर आमच्या संस्कृतीचे मानक आहेत. त्यामुळे प्रभु श्रीरामांना कुणी मानत असेल, तर त्याची जात-धर्म आम्ही पाहणार नाही. त्यांना आम्ही सोबत घेतलेले आहे. आमचे हिंदुत्व व्यापक आहे, पण हिंदुत्व सोडणार नाही, सोडले नाही. त्यामुळे पलटी मारणाऱ्यांनी आम्हाला सांगू नये, असा घणाघात देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर केला.

**महाराष्ट्र जनशक्ती**

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ डिसेंबर २०२५

# रोटरीच्या वतीने किसान दिनानिमित्ताने शेतकऱ्यांचा सत्कार



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** रोटरी क्लब मुरूमच्या वतीने किसान दिनाचे औचित्य साधून प्रगतशील शेतकरी त्याचबरोबर उपक्रमशील शेतकरी संजय मिनियार, मुरूम , अमर पवार भुयार चिंचोली, नितीन शेळके मुरूम, दयानंद व्हनाळे मुरूम यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ.आप्पासाहेब सूर्यवंशी होते तर प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र कृषी सेवा केंद्राचे आप्पासाहेब पाटील, व्यंकटेश सुपर मार्केटचे विष्णुदास मुंदडा उपस्थित होते. प्रगतशील आणि उपक्रमशील शेतकऱ्यांचा सत्कार हा नव्या पिढीतील युवकांना नक्कीच मार्गदर्शक ठरणार असून त्यांनी केलेल्या कामाचा गौरव व्हावा आणि त्यातून नव युवकांना प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश रोटरी क्लब आहे,असे प्रमुख अतिथी अप्पासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. शेतीला जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन असे अनेक व्यवसाय आपल्याला करता येतात त्याचबरोबर आम्ही आज जवळपास २०० लिटर दूध रोज विकतो त्यातून मला बराच फायदा झालेला आहे असे संजय मिनीयार आणि ॲड अमर पवार यांनी व्यक्त केलेअध्यक्षीय समारोपात बोलताना प्रा डॉ आप्पासाहेब सूर्यवंशी म्हणाले आजचा युवक हा बेरोजगार झालेला असून त्यांना शेती व्यवसायामध्ये आवड निर्माण करण्याचे काम आपल्या माध्यमातून व्हावे हाच उद्देश ठेवून रोटरी क्लब मुरूमने प्रगतशील आणि उपक्रमशील शेतकऱ्यांचा गौरव या ठिकाणी केला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कांबळे यांनी केले तर आभार सुनील राठोड यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भूषण पाताळे, गोविंद पाटील यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी डॉ.नितीन डागा, राजेंद्र वाकडे, कलया स्वामी, शिवकुमार स्वामी उपस्थित होते

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्रभरातून भोई समाजाचे अडतीस उमेदवार नगरसेवक

नव्या युगाला स्वप्न दावणारा अभिमान हो... समाज क्रांतीचा ध्वज हो...या युगाचा अंधार सावरून नव्या युगाची मशाल हो...हे भोया तू मान हो तू सन्मान हो...महाराष्ट्रभरात भोई समाजाने फडकवला क्रांतीचा ध्वज महाराष्ट्रभरात भोई समाजाचे एकूण ३८ उमेदवार नगरसेवक होऊन भोई समाज इतिहास घडवल्याचा साक्षीदार बनला आहे. नव्या पिढींसाठी नव्या उमेदीचा किरण बनला आहे . ज्याच्या पदरात नियती पिढ्यानपिढ्या फाटकी तुटकी जिंदगी टाकत आली. नियतीने भिकेत दिलेली फाटकी तुटकी जिंदगी कष्टाच्या घामात भिजून पाषाण झालेल्या देहावर दारिद्र्याचे घाव सोसत भोई समाज आता सुखाच्या दिवसाकडे वळता झाला आहे. स्वतःचं आयुष्य मढवता झाला आहे. माझा भोई समाज आता परिस्थितीवर मात करता झाला आहे. तो लढता झाला आहे. नशिबांच्या भोगांवर मात करतो आतारडत बसत नाही. भोगाला ढाल करुन लढायला शिकलो आता परिस्थितीशी लढता लढता जिंकण्याचं बळ पंखात भरले आता मनाशी ठरवलं आता परिस्थितीवर मात करायचीशिक्षणाची गंगा घराघरात न्यायची मुलांबाळांना शिकवायचं आता रडायचं नाही आतालढायचं आता... समाज सुशिक्षित आणि सुसंस्कृत तसेच प्रगतशील होत असल्याचे पुरावे म्हणजेच आजचा हा निकाल नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत महाराष्ट्र राज्यातून भोई समाजाचे ३८ उमेदवार नगरसेवक पदाचे दावेदार बनले. १) नारायण येलेरवाड भोई - लोहा, २) सतीश उशोल भोई - धर्माबाद, ३) गंगाबाई नारायण कोल्हे भोई -किनवट, ४) शिवानी काथवटे भोई - शेवगाव -अहिल्यानगर, ५) प्रियंका अमोल काशीद भोई -राहुरी- अहिल्यानगर, ६) प्रियंका आडगुलवाड भोई -उमरी, ७) संदीप आपटे भोई -हुपरी, ८) बजरंग लिंबोरे भोई -पैठण, ९) सुरेश अण्णा नेमाडे भोई - गंगापूर, १०) दत्तात्रय दासकर भोई -नळदुर्ग धाराशिव,११) शशिकांत पुदाले भोई - नळदुर्ग धाराशिव,१२) सोमनाथ हुशारे भोई -मंगळवेढा, १३) इंदुबाई घट्टे भोई -बुलढाणा, १४) अपर्णा किशोर सिद्धे भोई -अक्कलकोट सोलापूर, १५) सचिन रामचंद्र तारु भोई -भोर- पुणे, १६) पल्लवी समीर सागळे भोई -भोर- पुणे, १७) गणेश बाळू मोहिते भोई -भोर- पुणे,१८) अमित ज्ञानोबा सागळे भोई -भोर- पुणे,१९) आकांक्षा योगेश वाघवले भोई-वडगाव-पुणे,२०) नितीन मगरे भोई -मेढा, २१) घनश्याम पिंटू चक्की भोई -वाई - खडाळा-सातारा, २२) आशा मुळे भोई -कराड -सातारा, २३) अभिषेक डहारे भोई -रामटेक, २४) लक्ष्मीबाई आहिकर भोई - रामटेक, २५) माणिकराव ताकोद भोई - रामटेक,२६) अमोल कचरु इंदारखे भोई - भगूर, २७) वाल्मिक लहीरे भोई -कोपरगाव- अहिल्यानगर, २८) नरेंद्र एकनाथ भोई - वरणगाव, २९) लताबाई शिवदे भोई - शहादा, ३०) केतकीताई राजेश भोई -शिरपूर, ३१) पुष्प पंकज मोरे भोई -अमळनेर,३२) संदीप आपटे भोई -हुपरी, ३३) गंगाबाई नारायण कोल्हे भोई- किनवट, ३४) मीनाक्षी गेडाम भोई आरमोरी- गडचिरोली, ३५) गुट्टी मारबते भोई- गडचिरोली, ३६) वर्षा पढाल भद्रावती भोई- चंद्रपूर, ३७) गौरव नागपुरे भद्रावती भोई- चंद्रपूर, ३८) ॲड. शुभांगी विजय काथवटे भोई- सातारा ही सर्व भोई समाज मंडळी आज राजकीय क्षेत्रात आपलं अस्तित्व निर्माण करुन समाजाचे इतिहासात नोंद केल्याची जिवंत साक्ष आहे. जनतेतून नगरसेवक होऊन आपला अस्तित्व निर्माण करणाऱ्या समस्त भोई समाज बंधू भगिनींचे हार्दिक हार्दिक अभिनंदन...समस्त भोई समाजसेवकांना विनंती करतो की, राजकीय अस्तित्व हे, असे एक ब्रह्मास्त्र आहे. की हे अस्त्र नव्या जून्या पिढीला आपलं, आपल्यापाशी हवे नको सर्वस्व पणाला लावायला मजबूर करणारे आहे. २१ डिसेंबर २०२५ चा भोई समाजाचा हा राजकीय इतिहास येणाऱ्या पिढ्यांसाठी पाठबळ देणारा इतिहास झाला आहे .या राजकीय अस्तित्वातून या भारतीय समाजाला भोई समाजाच्या नेतृत्वाचा अभिमान वाटावा अशी समाजसेवा आपल्या हातून घडो ! समाज अजून प्रगती पथावर जावो ! ही ईश्वरचरणी प्रार्थना आणि सगळ्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरुन शुभेच्छा...



- लक्ष्मण वाल्डे

कन्नड

मो.नं : ८८८८६०६०६८

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ डिसेंबर २०२५

# ठाकरेंच्या युतीनंतर आता शिंदे नाईकांचे मनोमिलन



**मुंबई** : महापालिकेच्या अनुषंगाने शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेत युतीची घोषणा केली आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे कट्टर विरोधक समजले जाणारे भाजपचे नेते व मंत्री गणेश नाईक यांच्यातही मनोमिलन होणार असल्याची चर्चा सुरू आहे. एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यात जवळपास १५ मिनिटे बंद दाराआड चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील इतर महानगरपालिका निवडणुकीच्या संदर्भात दोघांत चर्चा झाल्याची सूत्रांची माहिती आहे.

एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक हे दोघेही नेते एकमेकांना मंत्रालयात भेटले. येथे दोघांमध्ये बंद दाराआड जवळपास १५ मिनिटे चर्चा झाली. या दोघांमध्ये गेल्या काही दिवसांपासून शीतयुद्ध सुरू होते. परंतु, आजच्या भेटीने एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांचे मतभेद दूर झाले असल्याचे बोलले जात आहे. तसेच महापलिका निवडणुकीच्या अनुषंगाने दोघांचे मनोमिलन होणार असल्याचे बोलले जात आहे.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी नवी मुंबईत आपले वर्चस्व निर्माण करत गणेश नाईक यांच्या प्रस्थापित राजकारणाला मोठे आव्हान दिले होते. मात्र, राज्यात सत्तांतर होऊन देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाल्यानंतर स्थानिक समीकरणे बदलली. फडणवीसांनी गणेश नाईक यांना मंत्रिमंडळात स्थान देऊन त्यांचे राजकीय वजन वाढवले, ज्यातून शिंदे आणि नाईक यांच्यातील सुप्त संघर्षाला खऱ्या अर्थाने तोंड फुटले.

मंत्रिपद मिळाल्यानंतर गणेश नाईक यांनी थेट मुख्यमंत्री शिंदेंचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात जनता दरबार भरवण्यास सुरुवात केली, ज्यामुळे शिंदे गटाकडून त्यांच्यावर तीव्र टीका झाली. या संघर्षाची धार अधिक तीव्र झाली जेव्हा नाईकांनी नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजपने स्वतंत्रपणे लढावे, असे संकेत दिले. या अंतर्गत वादामुळे महायुतीमधील अस्वस्थता सातत्याने समोर येत होती.

मात्र, सध्या मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई पट्ट्यात ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीमुळे महायुतीसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. ही बदलती राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन महायुतीने आता सावध पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. ठाकरे गटाच्या आव्हानाला रोखण्यासाठी अंतर्गत मतभेद बाजूला सारणे आवश्यक असल्यानेच, एकनाथ शिंदे आणि गणेश नाईक यांच्यातील या ताज्या भेटीकडे एक महत्त्वाची राजकीय तडजोड म्हणून पाहिले जात आहे.

# कन्नड येथे संस्कार, संस्कृती आणि शिक्षणाचा संगम साधणारे स्नेहसंमेलन



**कन्नड (अरुण थोरात) :** शहरातील गुणवत्तापूर्ण शिक्षण व उपक्रमशीलतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ, कन्नड संचलित साधना पाटील प्राथमिक विद्यालय, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय व डॉ.टी.एस पाटील इंग्लिश स्कूल, नरसिंगपूर येथे साने गुरुजी जयंती समारोह निमित्त शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन रविवार व सोमवार डिसेंबर रोजी उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर आधारित नृत्यप्रकार सादर करून महाराष्ट्रासह देशातील विविध संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले.साधना पाटील विद्यालयाच्या प्रांगणात पहिल्या दिवशी सकाळच्या सत्रात सामान्य ज्ञान परीक्षा व ‘आनंद नगरी’ उपक्रम, तर दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात ‘श्यामची आई’ संस्कार परीक्षा घेण्यात आली. दुपारच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर बहारदार नृत्य सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली, तर चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने विशेष आकर्षण ठरले. उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत शाळेचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. संपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रमाचे परीक्षण पत्रकार सहयोग जावळे व कृष्ण वाघ यांनी केले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.मिलिंद पाटील, संस्थेचे सचिव टी.एस कदम, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रभाकर मनगटे, संचालक नितीन पाटील, संचालिका शारदाताई पाटील, संचालिका निर्मलाताई कदम, संचालिका मंगल गवते, संचालक श्याम कदम, संस्था प्रतिनिधी हर्षदा कदम, डॉ.सिद्धार्थ पाटील, संपतराव कदम, आसराबाई कदम, आदर्श हॉटेल संचालक टोम्पे नाना, उद्योजक तथा समाजसेवक इंद्रजीत चव्हाण, प्रा.योगीराज सोमवंशी, खरेदी-विक्री संघ संचालक आकाश बोलधने, भाजपा तालुका सरचिटणीस विष्णू राठोड, रिठ्ठी-मोहार्ड सरपंच ताराबाई राठोड, सातदिवे पेट्रोलियम संचालक अजय सातदिवे, अंकुश बाविस्कर, दशरथ राठोड, प्राइड एज्युकेशनचे संचालक सतीश शर्मा, स्वप्निल देशमुख, निखिल कदम, बीट कॅम्पुटर संचालक अर्जुन दळवी, मच्छिंद्र चोभे, नारायण काळे, डॉ.रोहिदास पाटील, डॉ.विलास पाटील, डॉ.प्रकाश नागणे, पांडुरंग राठोड, विलास बनसोडे, अमीन शेख, अमरसिंग राठोड, प्रसाद जैस्वाल, ओम जैस्वाल, मुख्याध्यापक भगवान ठाकरे, मुख्याध्यापक धैर्यशील केरे, मुख्याध्यापक नरेंद्र पवार यासह आदी मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. समारोप प्रसंगी उपस्थित महिला मातापालकांमधून लकीड्रॉ काढून विजेत्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांच्यासह विजया कुमावत, अस्मिता कदम, मंजिरी कदम, प्राजक्ता तागवाले, उज्वला सोनुने, मनीषा बारगळ, अमोल घुगे, सुनील मोरे, श्रीराम जाधव, नामदेव पवार, पांडुरंग मगर, नितीन मगर, सागर पाटील, प्रभाकर चौधरी, सुभाष आघाडे आदी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी पौर्णिमा पवार व राजनंदनी राठोड तसेच शिक्षक अमोल घुगे यांनी केले, तर मुख्याध्यापक नरेंद्र पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्रतिनिधी नेमणे आहे
महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.
दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य
Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ डिसेंबर २०२५

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सोमवार दिनांक २२ डिसेंबर रोजी राष्ट्रीय गणित दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात थोर भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, उपप्राचार्य प्रा. जी. एस. मोरे, पर्यवेक्षक शैलेश महामुनी आणि गणित विभाग प्रमुख डॉ . व्ही. एम. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी रामानुजन यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत गणित ही केवळ आकड्यांची गणना नसून, ती तर्कशक्ती, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची कला असल्याचे स्पष्ट केले. आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या युगात गणिताचे महत्त्व अधिक वाढले असून, स्पर्धा परीक्षा, संशोधन, अभियांत्रिकी, अर्थशास्त्र आणि संगणक क्षेत्रात गणिताचा मूलभूत वाटा आहे, असे त्यांनी सांगितले.पुढे बोलताना प्राचार्य डॉ. अस्वले म्हणाले,“श्रीनिवास रामानुजन यांचे जीवन हे जिद्द, चिकाटी आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक आहे. मर्यादित साधनसामग्री असूनही त्यांनी जागतिक स्तरावर भारतीय गणिताचा ठसा उमटवला. विद्यार्थ्यांनी रामानुजन यांच्याकडून प्रेरणा घेऊन अभ्यासात सातत्य ठेवावे, प्रश्न विचारण्याची सवय लावावी आणि गणिताकडे भीतीने नव्हे तर जिज्ञासेने पाहावे. गणित विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण बौद्धिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.”याप्रसंगी गणित दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील करिअर कट्टाच्या वतीने AWS Cloud computing course हा केवळ २२ मिनिटात व्हिडिओ द्वारे प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र मिळवणे हा उपक्रम घेण्यात आला. उपपक्रमात एनएसएस, एनसीसी आणि करिअर कट्टाचे विद्यार्थी सक्रिय सहभागी होऊन याप्रमाणपत्र प्रशिक्षणाची माहिती इतरांना दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी डॉ. भारत शेळके, कॅप्टन डी. एस. चितमपल्ले, डॉ. विनोद देवरकर, डॉ. अशोक पदमपल्ले, डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. अर्जुन कटके, डॉ. चंद्रसेन करे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. समाधान पसरकले यांनी केले तर डॉ. व्ही. एम. गायकवाड यांनी आभार मानले

## जिजामाता महाविद्यालय निपाणी येथे साने गुरुजींना अभिवादन



**कन्नड (अरुण थोरात) :** जिजामाता महाविद्यालय निपाणी ता. कन्नड जिल्हा छत्रपती येथे दि. २४ डिसेंबर रोजी साने गुरुजींची १२५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली.पांडुरंग सदाशिव साने यांना साने गुरुजी म्हणून ओळखले जाते, ते एक महान मराठी साहित्यिक, शिक्षक, समाजसुधारक आणि स्वातंत्र्य सैनिक होते. महाविद्यालयात साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले व जयंती साजरा करण्यात आली.यानिमित्ताने महाविद्यालयातकथास्पर्धा, सभेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी गुरुजींच्या जीवनासंबंधी भाषणे दिली.साने गुरुजींच्या विचारधारेचा प्रभाव आज ही समाजात दिसून येतो. प्रा. अजमेरा यांनी त्यांचे साहित्य आणि कार्य, ते सामाजिक जीवन जगत असताना प्रत्येक विद्यार्थ्यांना कशाप्रकारे प्रेरणादायी आहेत. याचे सखोल विवेचन आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले. प्राचार्य गोंगे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. यावेळेस महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**जाहिरात दर**

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# सुशासन : लोकशाही मूल्यांची सामाजिक पुनर्स्थापना

25 डिसेंबर हा दिवस भारतात ‘सुशासन दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका प्रशासकीय संकल्पनेचे औपचारिक स्मरण करणारा नसून लोकशाही व्यवस्थेच्या आत्म्याशी निगडित असलेल्या मूल्यांची, प्रक्रियांची आणि सामाजिक जबाबदाऱ्यांची पुन:एकदा चिकित्सा करण्याची संधी देणारा आहे. सुशासन म्हणजे केवळ कार्यक्षम प्रशासन किंवा वेगवान निर्णयप्रक्रिया नव्हे; तर नागरिकांच्या जीवनमानात प्रत्यक्ष सकारात्मक बदल घडवून आणणारी, सामाजिक न्याय, पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि लोकसहभाग या मूल्यांवर आधारित शासनपद्धती होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता सुशासन ही संकल्पना राज्य, समाज आणि नागरिक यांच्यातील परस्परसंबंध अधिक सुदृढ करण्याची प्रक्रिया आहे.लोकशाही शासनव्यवस्थेचा मूलाधार ‘जनतेचे, जनतेसाठी आणि जनतेद्वारे शासन’ या तत्त्वावर आधारित आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात हे तत्त्व कितपत साकार होते, हा प्रश्न नेहमीच उपस्थित राहतो. याच प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न म्हणजे सुशासनाची संकल्पना होय. समाजशास्त्र हे शासनाकडे केवळ सत्ताकेंद्र म्हणून पाहत नाही, तर ते सामाजिक संस्था, सामाजिक संबंध आणि सत्तावाटपाची प्रक्रिया म्हणून अभ्यासते. त्यामुळे सुशासन म्हणजे केवळ प्रशासकीय सुधारणा नव्हे, तर सामाजिक संरचनेत समता, समावेशन आणि विश्वास निर्माण करणारी व्यापक व्यवस्था आहे.भारतीय समाज हा विविधतेने नटलेला, बहुभाषिक, बहुधर्मीय आणि बहुसांस्कृतिक समाज आहे. अशा समाजात सुशासनाची अंमलबजावणी करणे हे मोठे आव्हान आहे. सामाजिक विषमता, आर्थिक दारिद्र्य, जातीय भेदभाव, लिंगभाव असमानता, प्रादेशिक असमतोल आणि शैक्षणिक मागासलेपणा या समस्या शासनाच्या कार्यक्षमतेवर सतत प्रश्नचिन्ह उभे करतात. सुशासनाची खरी कसोटी ही अशा वंचित, उपेक्षित आणि दुर्बल घटकांपर्यंत शासनाच्या योजना, सेवा आणि हक्क किती प्रभावीपणे पोहोचतात, यावर अवलंबून असते.सुशासनाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ म्हणजे पारदर्शकता. पारदर्शक शासन म्हणजे निर्णयप्रक्रिया, धोरणे, निधीवाटप आणि प्रशासनातील कामकाज नागरिकांसमोर खुले असणे. माहितीचा अधिकार कायदा हा पारदर्शकतेच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल मानले जाते. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले असता पारदर्शकता ही सत्तेच्या केंद्रीकरणावर नियंत्रण ठेवणारी प्रक्रिया आहे. जेव्हा नागरिकांना माहिती मिळते, तेव्हा ते प्रश्न विचारू शकतात, चर्चा करू शकतात आणि सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरू शकतात. त्यामुळे सुशासन हे लोकशाही संस्कृतीच्या वृद्धीचे प्रभावी साधन ठरते.उत्तरदायित्व हा सुशासनाचा दुसरा महत्त्वाचा घटक आहे. शासनातील अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संस्था यांनी आपल्या कृतींसाठी जबाबदार असणे आवश्यक आहे. समाजशास्त्र सांगते की उत्तरदायित्वाचा अभाव हा भ्रष्टाचार, मनमानी आणि सत्तेच्या गैरवापराला जन्म देतो. सुशासनात केवळ कायदे असणे पुरेसे नसते, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि दोषींवर कारवाई होणे तितकेच महत्त्वाचे असते. नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी शासनाने स्वत:ला सतत जनतेसमोर उत्तरदायी ठेवणे ही काळाची गरज आहे.लोकसहभाग ही सुशासनाची आणखी एक महत्त्वाची संकल्पना आहे. शासन हे केवळ वरून खाली चालणारे यंत्र नसून नागरिकांच्या सहभागातून घडणारी प्रक्रिया आहे. ग्रामसभा, स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक सल्लामसलत, सामाजिक लेखापरीक्षण यांसारख्या माध्यमांतून लोकांचा सहभाग वाढविणे म्हणजे लोकशाही अधिक सशक्त करणे होय. समाजशास्त्रीय अभ्यासातून असे दिसून येते की ज्या ठिकाणी लोकसहभाग अधिक असतो, तेथे योजना अधिक प्रभावी ठरतात आणि सामाजिक एकात्मता वाढते. सुशासन म्हणजे शासन आणि समाज यांच्यातील संवादाची दरी कमी करणे.सुशासन आणि सामाजिक न्याय यांचे नाते अतूट आहे. सामाजिक न्यायाशिवाय सुशासन ही संकल्पना पोकळ ठरते. अनुसूचित जाती-जमाती, भटक्या-विमुक्त जमाती, अल्पसंख्याक, महिला, दिव्यांग आणि गरीब घटकांसाठी विशेष धोरणे राबविणे हे सुशासनाचे महत्त्वाचे अंग आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने शासनाची खरी जबाबदारी ही समाजातील असमानता कमी करणे आणि सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे ही आहे. जर विकासाचे लाभ काही मोजक्या घटकांपुरते मर्यादित राहिले, तर ते शासन सुशासनाच्या निकषांवर उतरू शकत नाही.आधुनिक काळात तंत्रज्ञानाने सुशासनाला नवी दिशा दिली आहे. ई-गव्हर्नन्स, डिजिटल सेवा, ऑनलाइन पोर्टल्स, थेट लाभ हस्तांतरण यांसारख्या उपक्रमांमुळे शासन अधिक वेगवान आणि सुलभ झाले आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता तंत्रज्ञान हे केवळ साधन आहे; त्याचा उपयोग कोणासाठी आणि कशासाठी केला जातो, हे महत्त्वाचे आहे. डिजिटल दरीमुळे जर काही घटक शासनाच्या सेवांपासून वंचित राहत असतील, तर ते सुशासनाच्या तत्त्वांना धरून नाही. त्यामुळे तंत्रज्ञानासोबतच सामाजिक समावेशनावर भर देणे आवश्यक आहे.सुशासनाचा विचार करताना नैतिकता आणि मूल्याधिष्ठित प्रशासन यांचाही उल्लेख करणे अपरिहार्य ठरते. शासनव्यवस्थेत नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाल्यास कोणतेही कायदे किंवा योजना प्रभावी ठरत नाहीत. समाजशास्त्र सांगते की प्रशासनातील मूल्यसंस्कृती ही समाजाच्या एकूण मूल्यसंस्कृतीशी जोडलेली असते. प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, सेवाभाव आणि कर्तव्यनिष्ठा ही मूल्ये जर प्रशासकीय यंत्रणेत रुजली, तरच सुशासन प्रत्यक्षात साकार होऊ शकते.आजच्या काळात सुशासनासमोर अनेक आव्हाने उभी आहेत. वाढती लोकसंख्या, शहरीकरण, पर्यावरणीय संकटे, बेरोजगारी, सामाजिक संघर्ष आणि राजकीय ध्रुवीकरण यामुळे शासनावर मोठा ताण येतो. अशा परिस्थितीत सुशासन म्हणजे केवळ संकट व्यवस्थापन नव्हे, तर दीर्घकालीन सामाजिक विकासाची दिशा ठरविणे होय. समाजशास्त्रीयदृष्ट्या सुशासन हे स्थिरता आणि परिवर्तन यांच्यातील संतुलन साधण्याची प्रक्रिया आहे.25 डिसेंबर रोजी साजरा होणारा सुशासन दिन हा लोकशाही शासनाच्या व्यापक संकल्पनेचे प्रतीक आहे. हा दिवस आपल्याला विचार करायला भाग पाडतो की आपले शासन खरोखरच लोकाभिमुख आहे का, निर्णयप्रक्रियेत सामान्य नागरिकांचा आवाज ऐकला जातो का, आणि विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो का. सुशासन दिन म्हणजे आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.अखेरीस असे म्हणता येईल की सुशासन ही कोणतीही अंतिम अवस्था नसून ती एक सतत चालणारी सामाजिक-प्रशासकीय प्रक्रिया आहे. शासन, समाज आणि नागरिक यांच्यातील परस्पर विश्वास, संवाद आणि सहकार्य यावरच तिचे यश अवलंबून असते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सुशासन म्हणजे केवळ ‘चांगले शासन’ नव्हे, तर ‘न्याय्य, समावेशक आणि मानवी संवेदनांनी युक्त शासन’ होय. अशा सुशासनातूनच खऱ्या अर्थाने लोकशाही मजबूत होऊ शकते आणि समाजाचा सर्वांगीण विकास साधता येऊ शकतो. सुशासन दिनानिमित्त हीच जाणीव समाजमनात अधिक दृढ होणे, हीच या दिवसाची खरी फलश्रुती ठरेल.



**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra५@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २५ डिसेंबर २०२५



प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## धर्म

तो धर्म मानवांचा
शोधू कसा कुठे रे
नवरत्नाच्या गाभाऱ्यात
तो लपला असेल का रे..

का मडविला सुवर्णानी
देवालई धर्म तुमचा
का शिखरावरत मोतीयानी
चढवीला धर्म तुमचा.

असेल ऐक्य भारताचे
सांगेल का धर्म तुमचा
चातुरवर्ण व्यवस्था
मोडेल का धर्म तुमचा.

भय धर्म मार्तंडांचे
इथे तांडव चालते रे
मांडव सोनियांचे
रोज नव्याने उभारते रे

मोडा कळस धर्मांधतेचे
नवराष्ट्र निरमुया रे
नसेल कोणी भुकेकंगाल
तो दिवस पाहू या रे

ना थांबणे इथेच कोनी
जाऊ पुढे चला रे
नवं राष्ट्रनिर्मिन्यासाठी
कारवा सुरु करा रे.


**विद्रोही भूमिपुत्र वाघ**
९१७२९७२४८२


## नाताळ

नाताळाच्या सणाला
येते आनंदाला भरती
चैतन्याच्या प्रकाशात
न्हाऊन निघे धरती

घेऊन हरणांची गाडी
येईल सांताक्लॉज
घालूनी लाल अंगरखा
मखमली टोपीचा साज

पाठीवरील पोतडीत आणेल
मुलांसाठी खेळणी व खाऊ
जींगल बेल जींगल बेल
मुलासोबत लागेल गाऊ

आनंदाच्या पर्वनित
ख्रिसमस ट्री येईल बहरून
लुकलूकणाऱ्या तारकात
जो तो खेळेन दुःख
विसरून

असाहा नाताळ सण
सांगतो जीवनातले सत्य
एक दुसऱ्यावर सदा
प्रेम करावे नित्य




मो. ९०११५५९१०६


## सोंग

जीणं पोरकं झालं
अन् आलो सिमेंटच्या जंगलात
पोटपाण्यासाठी
म्हणून वठवतोय सोंग
नव्या नवरीप्रमाणं..नवं.

खूप खाल्ले उन्हाळे पावसाळे
लहान सहान ठेचासोबत
पण सोडत नाही
पेरणं.. बाप पेरायचा तसं..

बाप पुरून उरला होता
बहात्तरच्या दुष्काळाला
अन् पेरलं होतं रान
पाऊस पाणी नसतानाही
तरी उगवून आलं होतं
पिक हिरवंगार
सोन्यापरीस शिवारभर..

म्हणून करत नाही मी हिशोब
पेरलेलं किती उगवेल याचा..
ओंजळभर आभाळ घेऊन..

पण त्यांना वाटतंय
हे आभाळ त्यांच्या मालकीचं
म्हणून ओढू पाहताय पाय
सावलीतल्या खेकडयासम
पण मी भर उन्हात..दुष्काळात
उगवून आलोय काळ्या भुईतून
बिना पाण्याचा..
रब्बी पिकासारखा..

आता किती ही खुडले शेंडे
तरी भिडणार आहे आभाळाला
मूळं मातीत घट्ट रोवले म्हणून..




**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड
मो. ९४०३३ ८४८८९


# ....आणि षडुर्मी : मनमुक्त जगण्याचा हुंकार




**क**वी स्नेही प्रा रमाकांत कुळकर्णी यांचा पद्मगंधा प्रकाशन पुणे येथून प्रकाशित झालेला.ख्यातनाम लेखिका रेखा बैजल यांची मर्मग्राही प्रस्तावना पाठराखण हे भाग्य आहे.बलदंड बाहूच्या षडू ठोकणे.ही मनस्वी मनाची उर्मी आहे.जगण्याच्या रहाट पाळण्यात आपले आयुष्य विद्यार्थी हेचं दैवत मानून सेवा केली.माणुसकीची माणसं मिळवली.पण सुखी आनंदी मानुस कशाने रहातो.ते केवळ आपल्या सृजनशील भावनेचा निचरा कागदावर उतरविने.कवी रमाकांत कुळकर्णी सर हे सतत संघर्षरत राहून विचार आचर व प्रचार करीत मनस्वी जगणं कवितेत मांडत राहिले ते असं "अरे भक्तांनो, मला माझ्या एकट्याने एवढे सुख पाहवत नाही, अन् गाभाऱ्याच्या बाहेर आल्याशिवाय राहवत नाही"(पृ १८) मनाला जसं कुणी बंदिस्त करू शकत नाही.तसं मनांत देव ही आपल्या मानल्यावर आहे.मग देवच नवस करतो,शाम सुदामा यांच्या यांच्या मुक्त व्यक्ततेला आराम मिळतो.ही षडुर्मी अतिशय मोठा आशय ही देऊन जाते"अरे कृष्णा,तू एकदाच युद्ध केलं.तेही धर्मासाठी, माणुसकीसाठी...आम्ही बघ कसे धर्माधर्मात,जाती जातीत,गटागटात युद्ध करतो.कृष्णा तुझ्या अर्जुनला युद्ध करतांना नातेवाईक दिसले.पण आजचा अर्जून बंद खोलीत बटन दाबतो...मोह माया सत्ता,हिंसा उपभोग यासाठी तो रोजचं करतो युद्ध...(पृ२०)या आजच्या समकालीन वास्तवाचे सम्यक भेदक चित्रण वास्तवाचा आयना दाखवते ही कविता संयत मनोभूमिकेतून अस्सल वाटून जाते.आजच्या ऑफिस मधली फाईल गहाळ होते.तेंव्हातुकारामवर कारवाई होते.काही दिवसानी तिचं फाईल सापडते.माणुस बदलतो.पुन्हा टिंब टिंब..कवी रमाकांत कुळकर्णी हे मोठ्या तिरकस बोलीने आपल्या शब्दांची ठेवून ठेवताता.या कवितेचा आशय विषय माणूस असला तरी त्याच्या जीवनाच्या भूमी धारणेचा माय मातीचा,पिक पाण्याचा, दुष्काळाचा दस्तावेज आपल्या समोर ठेवते.ही शब्दांची भानामती अशी आहे की,जे बोचले टोचले,ते सल होऊन आले.या दुःखाला ही एक हसरी किनार आहे."स्मशान बोलतय"..ही सारीच मडरा मडरी, बिल्डर,कॉन्ट्रक्टर इंजिनिअर ही मेल्यावर ही स्मशानात भेटतात..हा अफलातून जात धर्म पंथ,मंदिर मस्जिद यांच्या डबर खडी सिमेंटच्या गोण्या ही वास्तवाची झलक यातून दिसून येते."हे माणसांनो निदान स्मशान तरी प्रेततात्म्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी राहु द्या.मेल्यानंतरशांती राहु द्या.(पृ २५) मनोरंजन करील जो मुलांचे प्रभूशी नाते जडले तयाचे तसे विधेयक दैवत्व ही त्यांनी घडविले.जगण्याचा हुंकार ही कविता मुखर करते.आपल्या आत्म अनुभूतीतून ते लिहितात "आम्ही गावाकडचे मित्र औरंगपुऱ्यात रूम करून राहत होतो.त्यावेळी दंगल उसळली आणि ती दंगल प्रत्यक्ष आम्ही डोळ्यांनी पाहिली.दंगलीची दृश्य, कर्फ्युच वातावरण, वृत्तपत्रातील बातम्या, घटना प्रसंग, साक्षात अनुभवलं.भूकेने पोट पेटायचं पण रुमवर कधी पीठ नाहीतरी मिठ नाही.दोन दोन दिवस उपाशी राहण्याची पाळी येत होती.त्याचवेळीजाणीव झाली की, गरीबांच्या चुली कशा पेटत असतील?(पृ ११)या कवितेने कारुण्य कणव दिली.बातम्या अंगावर उभरून आल्या की, कवीच्या मनाची स्थिती ही महिमातीची होऊन जाते.कविता वाचावी गावी. शिध्दहस्तलेखिका प्रस्तावनेत 'संस्कारी मनाची अनुभूती' शिद्हस्त लेखिका रेखा बैजल लिहितात "लेखक अगदी सुरूवातीलाअभिव्यक्त होतो तो कवितेतून आपल्या सृजनशील भावना, विचार, समाजाचं अवलोकन या सर्वांना प्रथम कवितेच्या माध्यमातून व्यक्त करतो.कथा कांदबरी आपण भाष्य करू शकतो. विश्लेषण करू शकतो.पण कवितेचं तसं होतं नाही.कविता आस्वाद साहित्य प्रकार आहे.'यामनीचे त्या मनी' असा प्रकार.(पृ.७) ही मनस्वी हृदयांकित कवितेचा मर्मग्राही अनुबंध मनाच्या खोल तळापर्यंत जाऊन उभारी देतो.काळाचा महिमा अपरंपार आहे.एक काव्यकलाकृती रमाकांत म्हणून तितकीच सुंदर आशय संपन्न सृजन समर्पक ठेवून देणारी आहे.या कवितेचा मर्मग्राही अनुबंध म्हणजे माणसाच्या वर्मावर तिरकसपणे गावं घालणारी कविता आहे जसे"मंदिरावर व मज्जीतीवर पहारा आहे दंगलखोराना मात्र सहारा आहे...(पृ ५०)ही समकालीन वास्तवाची जाणीव प्रखर करणारी कविता.कवी रमाकांत कुळकर्णी मनोगत म्हणजे आत्मिक स्वानंद."माझ्या बहुतांश कविता 'वृती आणि प्रवृत्ती 'स्वरूपाच्या आहेत.म्हणून षडुर्मी (शोक,मोह,क्षुदा, तृष्णा, जन्म आणि मरण)यात लोभी विरुद्ध कष्टाचे जीवन जगणारे मोह विरूद्ध वास्तवाची जाणीव, क्रोध विरूद्ध संयम,मंद विरूद्ध नम्रतेने जीवन संघर्षाची लढाई, जीवन तर प्रत्येक जण जगतो,पण रोज मरुन जगणारे स्वाभीमानी, तर काही इतरांच्या जगण्यावर जगणारे अशी दोन माणसं आपणास समाजात दिसतात.तेच माझ्या मनातले हुंकार आपल्या पर्यंत पोहचावे ही मनोमन इच्छा."(पृ १०) आजपावेतो संस्कारीत मनाची अभिव्यक्ती देताना मन:पुर्वक कवीने सर्वांचे ऋण व्यक्त केले आहे. कवीमित्ररमाकांत कुळकर्णी यांच्या शब्द अक्षरांसाठी हार्दिक शुभेच्छा. सभू परिवारास अर्पण.

**काव्यसंग्रह :- आणि षडुर्मी**
**कवी : रमाकांत प्रभाकर कुलकर्णी**
**पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके,**
जालना
पद्मगंधा प्रकाशन पुणे
प्रथमावृती :-१० डिसेंबर २०२५
मुखपृष्ठ:-अनिकेत
मुल्य:-१५० रूपये